# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.
# दिनांक २४.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—** मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २३/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६१ वाहन चालकाविरूध्दकार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन ४६,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री कर अंतर्गत दिनांक २३/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन आ.बाळापुर ०२, पोस्टे हिंगोली शहर ०१,हटटा ०१ अशा एकुण ०४ ठिकणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ६.४८ लिटर दारू असा एकुण १०,५२०/—रू कि.अं ची अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असुनआरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**फसवणुक :—** दिनांक २३/०९/२०२२ रोजी फिर्यादी तहेसीन अहेमद खान पि गुलाम यासीन खान व्य.व्यापार रा नांदखेडा रोड परभणी यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ४२०, ४६७,४६८,४७१,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. ०३.०१.१२ ते ३०.०६.२२ रोजी दरम्यान मल्हारवाडी हिंगोली येथे आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीसोबत जमीन विक्री बाबत इसारपावती करून सदर जमीन दि बॉम्बे मार्केटाईल को—ऑप बॅक शाखा औरंगाबाद येथे गहाणखत असतांना देखील इतराच्या हक्कात रजिस्ट्री व गहाणखत करून दिले व पुन्हा सदर जमीन राजस्थान मल्टीस्टेट कोऑप क्रेडीट सोसायटी लि परली वैजनाथ येथे गहान ठेवुन कर्ज घेतले व फिर्यादीची फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

पोलीस अधीक्षक हिंगोली
करिता